# प्रकरण एक

## प्रस्तावना

# प्रकरण एक

## प्रस्तावना

ख—या शिक्षणाचा आरंभ हा शिक्षकापासूनच होतो; म्हणून स्वत:च्या मनोविश्वाची घडण शिक्षकाला समजली पाहिजे. शिक्षक हे शिक्षण प्रक्रियेतील एक महत्वाचे केंद्रक आहे. विद्यार्थी किंवा विद्यार्थी शिक्षक हे दुसरे केंद्रक आहे. आजचा विद्यार्थी स्पर्धा वाढल्याने ज्ञान पिपासू बनत आहे. त्याच्या ज्ञानाची भूक भागविण्यासाठी अद्ययावत अभ्यासक्रम व पाठयक्रम हे एक तिसरे केंद्रक आहे, असे आपणास म्हणता येईल.

आज अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य याचबरोबर शिक्षणास ही मूलभूत गरज मानली जाते. शिक्षणाचा विविध पैलूंनी व बाजूंनी विचार केला जातो. वैयक्तिक दृष्टया शिक्षण हे सर्वांगीण विकासाचे सभोवतालच्या परिस्थितीशी समायोजन साधण्याचे माध्यम मानले जाते. शिक्षण हे सामाजिक दृष्टया समाज परिवर्तनाचे साधन तर आर्थिक दृष्टया ती देशाच्या विकासासाठी केली जाणारी गुंतवणूक समजली जाते. 'राष्ट्राचे भवितव्य हे वर्गा—वर्गातून घडत असते'. असे कोठारी आयोगाचे समर्पक विधान आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे.

शिक्षणाचा बराचसा भाग हा अनौपचारिक शिक्षणाने व्यापलेला आहे. औपचारीक शिक्षणात शिक्षकाला अनन्य साधारण महत्व आहे. आज शिक्षकाच्या भूमिका, कार्ये याबाबतच्या अपेक्षा विस्तारत आहेत. अध्यापनाच्या बाबतीत आज शिक्षकापुढे नवनवीन आव्हाने येत आहेत. विद्यार्थ्यांमधील व्यक्तिभेद, ज्ञानेंद्रियाच्या कार्य क्षमतेचा पूरेपूर वापर करून घेणे, विद्यार्थी, संस्था, गुणवत्तापूर्ण शिक्षण इत्यादी अनेकविध आव्हानांची योग्य जाणीव शिक्षकाला असणे गरजेचे ठरत आहे. या अव्हानांवर मात करण्यासाठी त्याने सक्षमही असले पाहिजे. या सक्षमीकरणाचा पाया हा शिक्षकाच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये अधिक पक्का होत असतो. शिक्षक—शिक्षण कार्यक्रमांतर्गत शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून विद्यार्थी—शिक्षक घडत असतो. आजचा विद्यार्थी शिक्षक हा उद्याचा शिक्षक म्हणून कार्य करणारा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

असतो. आज तो ज्या पध्दतीने ज्ञान व कौशल्य आत्मसात करतो त्या अनुषंगाने तो उद्या शिक्षक या नात्याने अध्यापन करतो. शिक्षक–शिक्षण कार्यक्रमातील सैध्दांतिक व प्रात्याक्षिक घटकामधून विद्यार्थी–शिक्षकांमध्ये गुणात्मक इष्ट स्वरूपाचा बदल व्हावा हा प्रमुख हेतु असतो. विद्यार्थी–शिक्षकाचे अध्ययन–अध्यापन आनंददायी व प्रभावी होण्यासाठी विषयाचे सखोल व समग्र ज्ञान हवे, तसेच त्या विषयामध्ये सामाविष्ठ असणा–या अनेकविध संकल्पनात्मक बाबींचे समृध्द ज्ञान हवे. अध्यापन कराव्या लागणा–या घटकानुरूप म्हणजेच आशयानुरूप अध्यापन पध्दती, तंत्रे व अनुदेशनात्मक साहित्याचे माध्यम या सर्व बाबीचे नियोजन कसे करावे याचे सुध्दा ज्ञान महत्वाचे ठरते.

"One can not be rigid in the use of teaching methods. All teaching methods are effective in certain stuations and not so effective in other situation content and objectives determine the method to be used".

असे भालवणकर ऐ. जी. (१९८५) हे आपल्या पी. एच. डी. शोधप्रबंधात अध्यापन पध्दतीबाबत नमूद करतात. म्हणजेच सर्व अध्यापन पध्दती या काही विशिष्ट परिस्थितीमध्ये प्रभावी ठरत नाहीत. आशय आणि उद्‌दिष्टे ही कोणती अध्यापन पध्दती उपयोगात आणावयाची हे निश्चित करतात म्हणून एक आणि एकच अध्यापन पध्दतीला चिटकून राहता कामा नये. एकूणच आपला आशय व उद्‌दिष्टे तसेच अध्ययनकर्त्यांचे स्वरूप लक्षात घेऊन अध्यापनाची कार्यनिती ठरविली तरच अध्ययन कर्त्यांची गुणवत्ता आपणास साध्य करता येईल. भूगोल विषयाच्या अध्यापनामध्ये हा मुलभूत दृष्टीकोन बाळगला तरच प्रभावी अध्यापनाची शैली आत्मसात करता येईल.

**भूगोल विषयाचे अध्यापन**

भूगोल हा विषय उच्च प्राथमिक व माध्यमिक स्तरावर अनिवार्य विषय होय. मानवी जीवनाशी निगडीत असणारा विषय होय. नैसर्गिक घटकामुळे जसे पृथ्वीवर बदल घडून येतात तसेच मानवाच्या विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे सामाजिक जीवनातही बदल होत आहेत. म्हणून भूगोल हा एक गतिमान विषय

आहे. भूगोल विषयाचे अध्यापन करत असताना विद्यार्थ्यांच्या वयोगटाचा तसेच त्यांच्या भौगोलिक, सांस्कृतिक, आर्थिक इत्यादी अनेकविध घटकांचा विचार करावा लागतो.

भूगोलाच्या अभ्यासात स्थळ, प्रदेश व संपूर्ण भूपृष्ठ यांचा अभ्यास केला जातो. हा अभ्यास म्हणजे अत्यंत गुंतागुंत असणारी एक वस्तुस्थिती आहे. यासाठी कोणत्याही भूगोलकारास संपूर्ण भौगोलिक घटनांचे ज्ञान असणे आवश्यक असते. वस्तुस्थिती किंवा वास्तवता हा एक त्रिमिती घटक असून भूगोलात ही वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला असतो.

भूपृष्ठावरील विविधता अभ्यासणे हा भूगोलाचा मूळ उद्देश आहे. यामुळेच भूपृष्ठाचा समग्र अभ्यास हा भूगोलाचा अभ्यास—विषय आहे. भूगोलात संपूर्ण पृथ्वीचे समग्र दर्शन घडविण्याचा प्रयत्न केलेला असतो. यामुळेच भूगोलाच्या अभ्यासाला पूर्णत्व प्राप्त झाले आहे. प्राकृतिक घटकांपासून मानव वेगळा केल्यास त्याला भौगोलिक अभ्यासात विशेष महत्व राहणार नाही. तसेच मानवापासून प्राकृतिक घटक वेगळे ठेवल्यास मानवी अस्तित्वाला व कर्तृत्वाला वाव राहणार नाही म्हणून प्राकृतिक घटकाबरोबरच मानवी घटक देखील तितकाच महत्वपूर्ण आहे.

**भूगोलाचे अभ्यासक्षेत्र**

भूगोलाचे अभ्यासक्षेत्र पुढील दोन गटात विभागले गेले आहेत.

अ) प्राकृतिक विभाग

ब) मानवी विभाग (सांस्कृतिक विभाग)

**अ) प्राकृतिक विभाग**

यामध्ये निसर्गत: निर्माण झालेल्या घटकांचा समावेश होतो. यांना नैसर्गिक घटक किंवा भौतिक घटक असेही म्हणतात. भूरूपे, हवमान, मृदा, जलाशय, वनस्पती, खनिजे व प्राणीजीवन इ. भौतिक घटक आहेत. प्राकृतिक भूगोल या

शाखेत यांचा अभ्यास केला जातो. मृदावरण, वातावरण, जीवावरण, जलावरण हे प्राकृतिक विभागाचे अभ्यास विषय आहेत.

**ब) मानवी विभाग**

यामध्ये मानवनिर्मित घटकांचा समावेश होतो. मानवी वसाहती, शहरे, खेडी, नदयावरील पूल, वाहतुकीचे मार्ग, धरणे, कालवे, जलविद्युत प्रकल्प, मानवी व्यवसाय, शेती, उद्योगधंदे, लोकसंख्या आणि विविध क्षेत्रामधील मानवी संपादन यांचा यामध्ये समावेश होतो. यांना सांस्कृतिक घटक किंवा सांस्कृतिक पर्यावरण असेही म्हणतात.

**मानवी जीवनातील भूगोलाचे महत्व**

भूगोलाचा उपयोग आपल्या जीवनात सातत्याने होत असतो. सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत भूगोलाचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या संबंध येत असतो. सुर्योदय, तापमान, दिवस, रात्र, महिने, ऋतू, हंगाम, धुके, दव, पाणी, अन्न इत्यादी घटकांचा प्रत्यक्षरित्या आपल्या जीवनाशी संबंध येतो. घरातील साधे उदाहरण म्हणजे विजेचे बटण दाबतो त्यावेळी असा प्रश्न पडतो ही वीज कोणत्या ठिकाणापासून येते? त्याठिकाणाचे नाव काय? त्या धरणाचे नाव काय? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे या सर्व प्रश्नाची उत्तरे भूगोल विषयात मिळतात.

कोणत्याही नागरिकाचे संपूर्ण व्यवहार भौगोलिक घटकांनी वेढलेले असतात. 'माझ्या जीवनाच्या कोणत्याही व्यवहाराशी भौगोलिक घटनांचा संबंध येता कामा नये.' असे म्हणणा—या व्यक्तिला स्थान कोठेच नसेल. आपल्या सर्वांचे जीवन भूगोलाने व्यापलेले आहे.

मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा, लोकजीवन इत्यादी गरजांवर भौगोलिक घटकांचा परिणाम होतो. प्रत्येक मानवाच्या प्राथमिक गरजेचे स्वरूप वेगळे असले तरी गरजा मात्र त्याच आहेत. उदाहरणार्थ महाराष्ट्र कोकण, सहयाद्री पर्वत, विदर्भ, खानदेश, दख्खनचे पठार इत्यादी ठिकाणी घरांची रचना वेगवेगळी आढळते.

भौगोलिक घटकांचा मानवांच्या क्रियांवर परिणाम होतो. म्हणून भूगोलाचा अभ्यास समंजसपणे केल्यास मानवी कल्याणाच्या दृष्टीने हितावह ठरेल.

भूगोल विषयातून शालेय स्तरावरील विद्यार्थ्यांमध्ये अनेक प्रकारचे ज्ञान, आकलन, उपयोजन, कौशल्य इत्यादी क्षमता प्राप्त होतात. भूगोलामध्ये नकाशावाचन, नमुने, चित्रे, आलेख, आकृत्या, हवामान यंत्राची रचना इत्यादी अनेक साहित्यातून विद्यार्थ्यांची निरीक्षण क्षमता वाढते.

**भूगोल अध्ययन—अध्यापनाचे हेतू**

**१. व्यवहारिक उपयुक्तता**

भूगोलाचा उपयोग निरनिराळया क्षेत्रात व निरनिराळया व्यवसायात होतो. युध्दात भौगोलिक ज्ञानाचा उपयोग होतो. भूगोलाचा उपयोग व्यापार व कारखानदारी या क्षेत्रात होतो. प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिकलेल्या भूगोलाचा उपयोग पुढे भूगोलाच्या निरनिराळया शाखांचा अभ्यास करताना होतो. वाणिज्य, अर्थशास्त्र, समाजशास्त्र यासारख्या विषयांचा अभ्यास करताना भूगोलाचा उपयोग होतो. पर्यटन क्षेत्रातही भूगोलाचा उपयोग होतो.

**२. मानसिक क्षमतांचा विकास**

निरनिराळया विषयांच्या अध्ययनाने विचार, तर्क, अनुमान, कल्पना इत्यादी मानसिक क्षमतांचा विकास होतो. भूगोलाच्या अध्ययनाचा उपयोग काही मानसिक क्षमतांच्या विकासात होतो. भूगोल अध्ययनात निरीक्षणाचा उपयोग केला जातो. त्यामुळे बारकाईने व काळजीपूर्वक निरीक्षण करण्याची सवय लागते. विद्यार्थी भौगोलिक घटनांचा कार्यकारण—संबंध सांगतो, समस्या सोडविण्याचा प्रयत्न करतो. यामुळे त्यांच्या विचार, अनुमान, तर्क या क्षमतांच्या विकासास मदत होते.

**३. सांस्कृतिक हेतू / मूल्य**

प्रत्येक नागरिक सुसंस्कृत असावा अशी अपेक्षा असते. जगातील घडामोडींचे ज्ञान त्यास वर्तमान पत्रे, मासिके, दूरदर्शन, आकाशवाणी या माध्यमांद्वारे मिळते. यातून त्यास बाजारभाव, शेतीविषयक माहिती, पंचवार्षिक, हवामानाचे अंदाज व

इतर योजना इ. माहिती मिळते. या माहितीबरोबरच संबंधित नकाशे, आलेख, कोष्टके असतात. रेल्वे व बस यांची वेळापत्रके कशी पहावीत याची माहिती नागरिकास हवी. याशिवाय प्रवासवर्णनांचे वाचन, निरनिराळे संग्रह करणे, सहली काढणे इ. गोष्टी फुरसदीच्या वेळात करता येतात. या सर्वांची गोडी भूगोल विषयाद्वारे शाळेत विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करता येते. आपलेपणा, सहानुभूती, सहकार्य यांतून एकता निर्माण होते. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी इतरांना मदत करणे. विकासासाठी देवाण—घेवाण म्हणजेच व्यापार करणे. निरनिराळी राष्ट्रे अनेक बाबतीत एकमेकांवर अवलंबून असतात. सहकार्य व सहानुभूतीसाठी नागरिकांची मने तयार करण्याचे काम शालेय जीवनातच भूगोल—शिक्षकांना करावे लागते. सारांश सुसंस्कृत व सुजाण नागरिक तयार करणे हा भूगोलाचा एक हेतू आहे.

**उच्च प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमातील भूगोलाचे स्थान**

अभ्यासक्रमाला अभ्यास योजना म्हणण्याची पध्दत आहे. शिक्षणाची उद्दिष्टे साध्य होण्यासाठी जे सुसंस्कृतयुक्त अनुभव योजले जातात त्यांचा समावेश अभ्यासक्रमात होतो. अभ्यासक्रम हे उद्दिष्टे साध्यण्याचे एक साधन आहे ते साध्य नव्हे. सर्वसामान्य अभ्यासक्रमातून ज्ञान, कौशल्ये, अभिवृत्ती, प्रयोग, व्यवसाय इत्यादींची जोपासना करणारे अनुभव असतात.

इयत्ता सहावी ते आठवी पर्यंतच्या वर्गांना उच्च प्राथमिक स्तर असे म्हणतात. या स्तरावर सुध्दा भूगोलाचा समावेश सामाजिक शास्त्रात केला आहे. यामध्ये इयत्ता सहावी मध्ये खगोल भूगोल प्रात्यक्षिक भूगोल, प्राकृतिक भूगोल, प्रादेशिक भूगोल इत्यादी अभ्यासक्रम समाविष्ट केला आहे.

इयत्ता सातवीच्या भूगोलाच्या पाठयपुस्तकामध्ये खगोल भूगोल, प्रात्यक्षिक भूगोल, मानवी भूगोल, प्राकृतिक भूगोल त्याचबरोबर प्रादेशिक भूगोलाचा देखील समावेश केलेला आहे.

इयत्ता आठवीच्या भूगोलाच्या क्रमिक पाठयपुस्तकामध्ये अवकाश भरारी, प्रात्यक्षिक भूगोल, प्राकृतिक भूगोल, प्रादेशिक भूगोल, मानवी भूगोल इ

अभ्यासक्रम समाविष्ट केला आहे. इयत्ता आठवीच्या भूगोल विषयातील अवकाश भरारी या प्रकरणात उपग्रह, उपग्रहाची कार्यप्रणाली, सुदूर संवेदन, भौगोलिक स्थान निश्चयन प्रणाली व अवकाश संशोधन या नवीन संकल्पनांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच प्रात्यक्षिक भूगोलांतर्गत क्षेत्र अभ्यास देण्यात आला आहे. सदर प्रकरणातून विद्यार्थ्यांमध्ये प्रकल्पाद्वारे अध्ययन व प्रत्यक्ष अनुभूतीतून शिक्षण हा दृष्टिकोन ठेवण्यात आला आहे. प्राकृतिक भूगोलामध्ये भू अंतर्गत हालचाली व बाहय हालचाली, वाहत्या पाण्याचे कार्य, हिमनदीचे कार्य, भूजलाचे कार्य, सागर जलाचे कार्य व भूकंप ज्वालामुखी या संकल्पनांचा समावेश करण्यात आला आहे. मानवी भूगोलामध्ये मानवी व्यवसाय, गॅट करार व जागतिकीकरण या संकल्पनांचा समावेश आहे. प्रादेशिक भूगोलामध्ये ऑस्ट्रेलिया खंड, अंटार्क्टिका खंड, जर्मनी व इटली या प्रदेशांचा अभ्यास देण्यात आला आहे. व युरोप खंड हा स्वयंअध्ययनासाठी देण्यात आला आहे.

**उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयाच्या अभ्यासक्रमाची वैशिष्टये**

१. भूगोल विषयाच्या अभ्यासक्रमाची रचना समकेंद्री पध्दतीने केली आहे.

२. खगोल, पर्यावरण, साधनसंपत्ती, प्राकृतिक, प्रात्यक्षिक व निरीक्षण या पाच विभागात भूगोलाचा अभ्यासक्रम विभागला आहे.

३. खगोल विभागात दिश, सुर्यमाला, पृथ्वीची गती, त्यांचे परिणाम, कालगणना, अक्षवृत्ते, रेखावृत्ते, स्थानिक वेळ, प्रमाणवेळ, विश्व, आकाशगंगा, चंद्रकला, ग्रहणे इ घटक आहेत.

४. प्राकृतिक विभागात भूरूपे, हवामान, खंड, महासागर यांच्या अभ्यासाबरोबर पृथ्वीची आवरणे, शिलावरण, जलावरण, वातावरण, जीवावरण यांचा विस्तार, भूकंप, ज्वालामुखी, खडक व विदारण यांचा समावेश आहे.

५. पर्यावरण व साधनसंपत्ती या विभागाची सुरूवात जिल्हा, राज्य, देश, आशिया खंड व त्यातील काही देश, खंड व काही प्रमुख देश असा चढता क्रम अभ्यासक्रमात ठेवलेला आहे.

६. प्रात्यक्षिक व निरीक्षण यात आराखडावाचन, आराखडा भरणे, आराखडा तयार करणे, नकाशाची अंगे, क्षेत्रभेट, नोंदी घेणे, अहवाल तयार करणे, संग्रह करणे अपेक्षित आहे. प्रकल्प व उपक्रम हा भाग अपेक्षित आहे.

भूगोलाच्च अध्यापनामध्ये वरील बाबींची योग्य पध्दतीने सांगड घालावी लागते. परंतु उच्च प्राथमिक व माध्यमिक भूगोल विषयाच्या अभ्यासक्रमामध्ये सामाविष्ट केलेल्या अनेकविध संकल्पनाचे अध्यापन सखोलपणे भौगोलिक व मानवी घटकाशी सांगड घालून केले जात नाही. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांना भूगोल विषय कंटाळवाणा नावडीचा वाटू लागतो.

व्याख्यान पध्दती अथवा वर्गामध्ये विद्यार्थ्यांना प्रकट वाचन करावयास सांगून भूगोल आशयाचे अध्यापन केले जाते. त्यामुळे शालेय स्तरावरच विद्यार्थ्यांना भूगोलातील संकल्पनांची सखोलपणे माहिती मिळत नाही. यासाठी बी. ए. बी. एड् (एकात्मिक) स्तरावरील विद्यार्थी–शिक्षकांना भूगोल विषयातील मानवी भूगोल या शाखेतील संकल्पनांची सखोल माहिती, अध्यापन पध्दती, कार्यनिती उपलब्ध करून दिली तर विद्यार्थी शिक्षकांना मानवी भूगोलातील आकलनास अवघड असणा–या संकल्पनांची समर्पक माहिती मिळेल. तसेच ती शालेय विद्यार्थ्यांना कशा पध्दतीने द्यावयाची याचीसुध्दा माहिती व जाणीव झाल्याने विद्यार्थी शिक्षकांना व भविष्य काळात शालेय विद्यार्थ्यांना निश्चितच उपयोग होईल.

भूगोलाचे अध्यापन कसे करावे? असा प्रश्न शिक्षकासमोर येतो. संशोधकाच्या मतानुसार भूगोलाचे अध्यापन करणे एक अव्हानात्मक बाब आहे. भूगोलाचे अध्यापन जाता जाता सहज करता येईल/येते तसेच पाठयपुस्तक वाचन करून करता येईल असा दृष्टीकोन बाळगणे घातक ठरणार आहे. भूगोल शिक्षकाडून फार मोठया अपेक्षा व्यक्त केल्या जातात. कारण भूगोल विषय हा गतिमान तसेच मानव समूहाशी सहसंबंध दर्शविणारा विषय होय. बी. ए. बी. एड् (एकात्मिक) व बी. एड् स्तरावरील विद्यार्थी–शिक्षकांनी भूगोल विषयातील मुलभूत संकल्पनांची सखोल माहिती घेऊन आशययुक्त अध्यापन पध्दती, शैक्षणिक

साधनांची समर्पक निवड, अद्ययावत उदाहरणे तसेच विषयांतर्गत व विषयाबाहेरील ज्ञान शाखेशी समवाय साधून आपले अध्यापन प्रभावी होण्याबाबत सतत प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. भूगोल विषयाचे अध्यापन करत असताना अध्ययनार्थीची बौध्दिक क्षमता व सांस्कृतिक पार्श्वभूमीचा सुध्दा विचार करणे आवश्यक ठरते.

संशोधकास फक्त संकल्पनामध्ये आवड आहे असे नसून संकल्पना जोपर्यंत विद्यार्थ्यांना समजत नाहीत तोपर्यंत विद्यार्थ्याची गुणवत्ता किंवा सर्वोत्तम कामगिरी आपणास दिसणार नाही. भूगोल हा सामाजिक शाखांमध्ये आंतर्भाव होणारा तसेच कला व शास्त्र या दोन्ही शाखांशी समवाय साधणारा विषय आहे. संल्पनात्मक भाग हा भूगोल विषयाचा मुख्य गाभा होय. भूगोल विषयातील अनेकविध शाखातील संकल्पनात्मक बाबींचे स्पष्टीकरण हे विद्यार्थ्यांना प्राथमिक स्तरापासून होणे अत्यंत महत्वाचे ठरते. यासाठी प्राथमिक स्तरापासून संकल्पनात्मक आशय हा योग्य स्वरूपात समजावून सांगणे अत्यंत आवश्यक आहे. एकूणच संकल्पनात्मक बाबीचे स्पष्ट आकलन प्राथमिक, उच्च प्राथमिक स्तरापासून होणे नितांत गरजेचे आहे. सदर संशोधनामध्ये संशोधकाने बी. ए. बी. एड् (एकात्मिक) स्तरावरील प्रथम व द्वितीय अध्यापन पध्दती घेतलेल्या विद्यार्थी शिक्षकांच्या मानवी भूगोलातील संकल्पनात्मक बाबींच्या स्पष्टतेवर तसेच संकल्पनांचे अध्यापन कसे करता येईल याबाबत भर दिलेला आहे.

**भूगोल विषयाची उद्दिष्टे**

१. मानवाच्या जीवन पध्दतीवर निरनिराळया भौतिक परिसरातील घटकांच्या होणा—या परिणामांचे आकलन होणे.

२. मानव भोवतालच्या परिसरातील नैसर्गिक देणग्यांचा जास्तीत जास्त उपयोग करून आपल्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न कसा करत असतो हे जाणून होणे.

३. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या सहाय्याने माणूस नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग करून घेऊन आपले राहणीमान उंचावण्याचा प्रयत्न करतो हे जाणून घेणे.

४. आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढविण्यासाठी जगाच्या निरनिराळया भागातील राहणीमानाच्या पध्दतीतील विविधता समजून घेणे.

५. मानवाने आपल्या कृतीने आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाचा जो –हास केला आहे. (उदा. हवेचे व पाण्याचे प्रदूषण, जंगलतोड) व ज्यामुळे मानवी जीवनाच्या अस्तित्वास धोका निर्माण झाला आहे, त्याची जाणीव निर्माण होणे व नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर सूज्ञपणे कसा करायचा हे समजून घेणे.

६. जगातील इतर लोकांनी आपापल्या नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग करून आपला विकास केला. या त्यांच्या अनुभवातून आपण भारतीय नैसर्गिक साधनसंपत्तीचा योग्य उपयोग करून आपला विकास करू शकतो इतकेच नव्हे तर आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाद्वारे नैसर्गिक साधन संपत्ती ही आपण वाढवू शकतो याचे ज्ञान होणे.

७. जगाच्या नकाशाद्वारे निरनिराळया देशांचे स्थान आणि आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये येणा–या प्रमुख नैसर्गिक साधन संपत्तीचे आणि प्रमुख आर्थिक उत्पादनाच्या वितरणाचे आकलन होणे.

८. नकाशे, पृथ्वीगोल, नकाशा संग्रह, तक्ते आणि छायाचित्रे, सरकचित्रे इत्यादी भौगोलिक साधन सामग्रीचा वापर करण्याची क्षमता संपादन करणे.

९. सहलीद्वारा सृष्टी निरीक्षण व मानवनिर्मित शेती, उदयोगधंदे, वाहन व्यवस्था इत्यादीचा प्रत्यक्ष अनुभव घेणे.

१०. स्थानिक राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर आंतरराष्ट्रीय सहकार्यामधून विकास घडवून आणणा–या उपक्रमांच्या फलितांचे आकलन होणे.

११. भौगोलिक कार्यकारण संबंध समजणे.

१२. भौगोलिक ज्ञान संपादनासाठी आपल्या पूर्वजांनी वापरलेली विविध साधने व पध्दती यांची माहिति घेणे.

वरील भूगोल विषयाच्या उद्दिष्टांचा विचार करून पाठयक्रमाची रचना केली जाते.

## भूगोलाच्या पाठयक्रमाची रचना

महाराष्ट्रात इयत्ता पहिली ते आठवी चा पाठयक्रम तयार करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांना आहे. पाठयपुस्तके तयार करण्याचा व छापण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे यांना आहे. इयत्ता नववी ते दहावी व इयत्ता अकरावी ते बारावी या चार इयत्तांचा पाठयक्रम व पाठयपूस्तके तयार करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ पुणे यांना आहे. या सर्व वर्गाच्या पाठयक्रमास महाराष्ट्र शासनाकडून मंजूरी घेऊन तो अमंलात आणला जातो.

भूगोलाच्या पाठयक्रमाची रचना करण्याच्या तीन पध्दती आहेत.

१. प्रादेशिक पध्दत २. घटक पध्दत ३. समकेंद्री पध्दत

### १. प्रादेशिक पध्दत

या पध्दतीनूसार निरनिराळया इयत्तांना निरनिराळया खंडाचा व देशांचा अभ्यास दिलेला असतो. त्यात परिसरापासून क्रमशः तालुका, जिल्हा, भारत देश, आशिया खंड व नंतर इतर खंड व त्यातील महत्वाचे देश व शेवटी महासागरातील बेटे व ध्रूवीय प्रदेश, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावर याची विभागणी संबंधित समिती ठरवत असते.

### २. घटक पध्दत

या पध्दतीत वास्तवतेचा गुण अधिक दिसून येतो. प्रादेशिक पध्दतीतील तार्किकतेचा क्रम येथे नसतो. त्यामुळे घटकांच्या निवडीचे स्वातंत्र्य येथे असते. या पध्दतीनुसार प्रथम परिसराशी व नंतर जिल्हयाशी संबंधित घटक घेता येतात.

### ३. समकेंद्री पध्दत

एकाच घटकाचा आशय विद्यार्थ्यांच्या वाढत्या वयानुसार निरनिराळया वरच्या इयत्तेत अधिक विस्ताराने दिला जातो. उदा. शिलावरण, जलावरण, वातावरण, बाहय कारके निर्मित भूरूपे इत्यादी एकच केंद्र असलेल्या वर्तुळाचा

विस्तार जास्त वाढत जातो. तसा पाठयक्रमातील त्या–त्या घटकांचा क्रमशः विस्तार व खोली वाढत जाते.

भूगोल विषयातील पाठयक्रमामध्ये मानवी भूगोलांतर्गत येणा–या उपशाखानिहाय संकल्पना हया समकेंद्री पध्दतीनुसार दिलेल्या आहेत. यासाठी ज्या त्या वयोगटामध्ये विद्यार्थ्यांना मानवी भूगोलातील संकल्पना स्पष्ट होणे अत्यंत महत्वाचे ठरते कारण एका इयत्तेतून पूढच्या इयत्तेत त्या संकल्पनेची व्याप्ती व खोली अधिक वाढत जाते. यासाठी बी. ए. बी. एड् एकात्मिक विद्यार्थी शिक्षकांच्या मानवी भूगोलांतर्गत असणा–या संकल्पना या स्पष्ट असणे म्हणजेच त्या संकल्पनाबाबतची सौध्दांतिक व अध्यापनशास्त्रीय माहिती अत्यंत महत्वाची ठरते.

**उच्च प्राथमिक स्तरावरील (इयत्ता सहावी ते आठवी) भूगोल पाठयक्रमाची उद्‌दिष्टे**

१.मानवाच्या जीवन पध्दतीवर निरनिराळया भौतिक परिसरातील घटकांच्या होणा–या परिणामांचे आकलन वाढविण्यास मदत करणे.

२.मानव सभोवतालच्या परिसरातील नैसर्गिक देणग्यांचा जास्तीत जास्त उपयोग करून आपल्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न कसा करीत असतो हे जाणून घेण्यास विद्यार्थ्यास मदत करणे.

३.जगातील इतर लोकांनी आपापल्या नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग करून आपला विकास केला या त्यांच्या अनुभवातून आपण भारतीय नैसर्गिक साधन संपत्तीचा योग्य उपयोग करून आपला विकास करू शकतो. इतकेच नव्हे तर आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाद्वारा नैसर्गिक साधन संपत्ती आपण वाढवू शकतो हे समजून घेण्यास मदत करणे.

४.नकाशे, पृथ्वीगोल, नकाशा संग्रह, तक्ते, छायाचित्रे, सरकचित्रे इत्यादी भौगोलिक साधनसामग्रीचा वापर करण्याची क्षमता वाढविण्यास विद्यार्थ्यास मदत करणे.

५.सहलीद्वारा सृष्टी निरीक्षण व मानवनिर्मित शेती, उद्योगधंदे, वाहनव्यवस्था इत्यादीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यात विद्यार्थ्यांना प्रोत्साहन व मदत करणे. अशा अनुभवाची उपयुक्तता वाढविण्यासाठी शालेय संग्रहालय तयार करणे व इतर संग्रहालयांना भेटी देणे यासाठी विद्यार्थ्यांना उत्तेजन देणे.

६.भौगोलिक कार्यकारण संबंध जाणण्यासाठी मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग करण्यास विद्यार्थ्यास प्रवृत्त करणे.

७.भूगोल तज्ञांनी प्रारंभीच्या काळात वापरलेली साधने व पध्दती यांचा विद्यार्थ्यास थोडक्यात परिचय करून देणे.

८.विज्ञान आणि तंत्रज्ञान यांच्या सहाय्याने माणूस नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग करून घेऊन आपले राहणीमान उंचावण्याचा प्रयत्न करतो हे जाणून घेणे.

९.आंतरराष्ट्रीय सामंजस्य वाढविण्यासाठी जगाच्या निरनिराळया भागातील राहणीमानाच्या पध्दतीतील विविधता समजून घेणे.

१०.मानवाने आपल्या कृतीने सभोवतालच्या पर्यावरणांचा —हास केला आहे.(उदा. जंगलतोड, प्रदुषण इ.) व त्यामुळे मानवी जीवनाच्या अस्तित्वास धोका निर्माण झाला आहे याची जाणीव निर्माण करून देणे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर सुज्ञपणे कसा करावयाचा हे समजावून देणे.

११.जगाच्या नकाशाद्वारे निरिनिराळया देशाचे स्थान आणि प्रमुख आर्थिक उत्पादनाच्या वितरणाचे आकलन करून देणे.

१२.स्थानिक राष्ट्रीय आणि जागतिक पातळीवर आंतरराष्ट्रीय सहकार्यामधून विकास घडवून आणण्याच्या उपक्रमाच्या फलितांचे आकलन करून देणे.

**संकल्पना अर्थ व व्याख्या**

मानवाच्या विचार प्रक्रियेमध्ये संकल्पना हा पायाभूत घटक होय. 'संकल्पना' शब्दाचा अर्थ पाहू.

1. An idea or representation of the common element or attribute by which groups or classes may be distinguished.

2. Any general or abstract intellectual representation of a situation, state or affairs or object.
3. A thought an opinion an idea or a mental immage.

- Dictionary of Education by C. V. Good.

4. 'The General Ideas which are used for classes of otea,s are called concepts'

- Encyelopedia of Britanica.

'वेगवेगळया गटात केलेली विभागणी किंवा समान गुणधर्म एकत्रित करून नेमका अर्थ सांगणे म्हणजे संकल्पना होय'.

"वर्गीकरण म्हणजे संकल्पना होय". — स्मिथ

"संकल्पना म्हणजे एक सर्वसामान्य कल्पना किंवा वर्गकल्पना किंवा काही मूलभूत विशेष समान असलेल्या व्यक्ती अगर वस्तूपैकी एका व्यक्तीची अगर वस्तूची कल्पना".

उदा:— मोगरा हे फूल आहे. फूल ही एक संकल्पना आहे अनेक मोग—याच्या फुलाबद्दल वापरलेला एक शब्द आहे. संकल्पना या नकळत बनतात किंवा शास्त्रासारख्या विषयात त्या मुद्दाम बनवल्या जातात. सर्व सामान्यत: संकल्पना पुढीलप्रमाणे बनतात. निरीक्षण, अवबोध, तुलना, निष्कर्षण व सामान्यीकरण. अनेक वस्तूमधील साधर्म्य निरखून त्याची तुलना करून त्याचे एकत्रिकरण एका संकल्पनेत केले जाते. सर्व विचार प्रक्रियांचा आधार म्हणजे संकल्पना, संकल्पनेमुळे बौध्दिक शक्तीमध्ये बचत होते. अनेक तपशील लक्षात ठेवावे लागत नाहीत. त्याचप्रमाणे संकल्पना भूत, भविष्य व दुरच्या वस्तूंबद्दल विचार करणे शक्य करते. 'मानव' या संकल्पनेमूळे आपण कुठल्याही मानवाविषयी विचार करू शकतो. संकल्पना अनेक गोष्टी एका वर्गाखाली आणते. उच्च संकल्पना अनेक छोटया संकल्पना एकत्र आणू शकते व त्यामुळे व्यवहार सूलभ होतो.

—शैक्षणिक टिपाकोश — शं. कृ. सोहनी

संकल्पनेचा अर्थ, व्याख्या व विवेचनावरून संकल्पनेच्या संदर्भात खालील बाबीचा उहापोह दिसून येतो.

१. अनेक घटना किंवा वस्तू यामधील सामायिक गुणधर्म संकल्पनेत सामाविष्ठ असतात.

२. आशयाचा नेमका अर्थ किंवा स्तर म्हणजे संकल्पना होय.

३. वस्तू घटना किंवा प्रसंग यासारख्या चेतकाचा गट किंवा समूह म्हणजे संकल्पना होय.

४. चेतक समूहाचे सामाईक गुणधर्मानुसार अथवा वैशिष्टयानुसार केलेले वर्गीकरणात्मक सारांश म्हणजे संकल्पना होय.

५. एखादा शब्द किंवा शब्द समूह याद्वारे सामान्यत: संकल्पना व्यक्त होतात किंवा त्यांचे प्रतिनिधित्व करतात.

**संकल्पनेचे घटक**

**ब्रुनर** यांनी संकल्पनेबाबत पाच घटक नमूद केले आहेत. ते पुढीलप्रमाणे

१. नाव

२. उदाहरणे

३. गुणधर्म

४. गुणधर्म मूल्य

५. संकल्पनेची व्याख्या

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने संशोधनाची उद्दिष्टे, व्याप्ती, मर्यादा लक्षात घेऊन मानवी भूगोलाच्या आशय समृध्दी संचामध्ये मानवी भूगोला अंतर्गत उच्च प्राथमिक स्तरावरील पाठयक्रमात सामाविष्ट असणा–या संकल्पनांच्या बाबतीत भूगोल विषय तज्ञ व भूगोल अध्यापन पध्दती अध्यापन करणारे शिक्षक–प्रशिक्षक (अध्यापक) यांच्या मार्गदर्शनानुसार संचामध्ये संकल्पनांची मांडणी किंवा विवेचन करताना संकल्पनेचे नाव, व्याख्या, व्याख्यांचे स्पष्टीकरण, गुणधर्म, संकल्पनेशी संबंधीत पूरक माहिती, उदाहरणे, आकृत्या, चित्रे, नकाशे, अध्यापन पध्दती, अध्यापनाची तंत्रे, शैक्षणिक साधने या लिखित माध्यमांचा (मुद्रीत) वापर केला आहे.

**संशोधनाची गरज** (Need of the study)

प्रस्तुत संशोधनाची गरज पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) शिक्षणशास्त्र पदवी अभ्यासक्रमासाठी येणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकांना, ज्यांची प्रथम व द्वितीय अध्यापन पद्धती भूगोल आहे. त्यांना सरावपाठापूर्वी मानवी भूगोलातील संबोध, संज्ञा, संकल्पना, नियम व तत्त्वे स्पष्टतेसाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

२) बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) विद्यार्थी-शिक्षकांना भूगोलाच्या सरावपाठापर्वूी संदर्भ साहित्य म्हणून या आशय समृध्दी संचाचा उपयोग होतो. तसेच त्यांच्या भौगोलिक ज्ञानाच्या दृढीकरणासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

३) प्रस्तुत संशोधनापूर्वी अशा प्रकारचे मानवी भूगोलाच्या आशयावर आशय समृध्दी संचासंदर्भात संशोधन झाले नसल्याने आणि तेही बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) शिक्षणशास्त्र पदवी स्तरावर असे संशोधन झाले नसल्याने या संशोधनाची विशेष गरज आहे.

४) विशिष्ट प्रकारचा स्वयं अध्ययन संच म्हणून उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी या आशय समृद्धी संचाचे उपयोजन करणार असल्याने त्याची गरज आहे.

५) परिपूर्ण व ज्ञानी भूगोल शिक्षक निर्मितीसाठी बी.ए.बी.एड्. व बी.एड् पदवी स्तरावर या संशोधनाची गरज आहे.

६) भूगोल अध्ययन अध्यापन प्रक्रिया गतिमान, प्रभावी, परिणामकारक व सहेतूक होण्यासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

८) बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) व बी.एड. (एक वर्षीय) भूगोल अध्यापन पद्धतीच्या विद्यार्थी -शिक्षकांना सराव पाठातील पाठ टाचणातील मानवी भूगोलाचे पाठ्यांश पृथःकरणासाठी प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

संशोधनाचे महत्त्व **(Significance of the Study)**

प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व पुढीलप्रमाणे सांगता येईल. बी. ए. बी. एड्चे विद्यार्थी-शिक्षक हे भावी पिढीचे शिक्षक आहेत. अशा शिक्षकांच्या हाती देशाचे भवितव्य म्हणजेच विद्यार्थी भूगोल विषयाचे ज्ञान घेणार आहेत. असा भूगोल शिक्षक भूगोल विषयात परिपूर्ण असणे आवश्यक आहे. जर प्रशिक्षण काळात त्यांच्या मानवी भूगोलातील संकल्पना, नियम, तत्वे, स्पष्ट नसतील तर त्याचा परिणाम त्यांच्या हाती शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांवर होणार आहे. म्हणून या संशोधनास विशेष महत्व आहे.

प्रस्तुत संशोधनापूर्वी अशा प्रकारचे मानवी भूगोलाच्या आशयावर आशय समृध्दी संचासंदर्भात संशोधन झाले नसल्याने आणि तेही बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) शिक्षणशास्त्र पदवी स्तरावर असे संशोधन झाले नसल्याने या संशोधनास विशेष महत्त्व आहे. विशिष्ट प्रकारचा स्वयं अध्ययन संच म्हणून उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थी या आशय समृद्धी संचाचे उपयोजन करणार असल्याने त्यास विशेष महत्त्व आहे. बी.ए.बी.एड्. चे आणि बी.एड्. पदवीस अध्यापन व सराव पाठासाठी मार्गदर्शन करणाऱ्या भूगोलाचे शिक्षक प्रशिक्षकांना हे संशोधन महत्त्वाचे आहे. बी.ए.बी.एड. (एकात्मिक) व बी.एड. (एक वर्षिय) भूगोल अध्यापन पद्धतीच्या विद्यार्थी -शिक्षकांना सराव पाठातील पाठ टाचणातील मानवी भूगोलाचे पाठ्यांश पृथ:करणासाठी प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.

**समस्या विधान** (Statement of Problem)

बी. ए. बी. एड्. (एकात्मिक) विद्यार्थी -शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मानवी भूगोल घटकांवर आधारित आशय समृद्धी संचाचे विकसन– एक अभ्यास.

**समस्या विधानातील पारिभाषिक संज्ञांच्या व्याख्या** (Defination of the term Used)

संशोधन विषय अधिक स्पष्ट व्हावा या हेतूने संशोधन समस्या विधानामध्ये वापरलेल्या संज्ञा व पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे दिल्या आहेत.

**बी.ए.बी.एड्. विद्यार्थी-शिक्षक**

**संकल्पनात्मक व्याख्या**

माध्यमिक स्तरासाठी शिक्षक घडविणारी शिक्षणशास्त्र पदवी बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) हा शासनमान्य असा अभ्यासक्रम आहे. प्रस्तुत अभ्यासक्रम चार वर्षाचा असून सदरचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर माध्यमिक स्तरावर शिक्षक म्हणून नोकरीत रूजू होता येते.

**कार्यात्मक व्याख्या**

महाराष्ट्रातील शिवजी विद्यापीठांतर्गत महावीर महाविद्यालयातील सन २०१२-१४ या शैक्षणिक वर्षात वी . ए . बी .एड् .एकात्मिक चे विद्यार्थी शिक्षक ज्यांची अद्यापन पध्दती भूगोल आहे .

**उच्च प्राथमिक स्तर**

**संकल्पनात्मक व्याख्या**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात (१९८६) दिलेल्या आकृतीबंधानुसार (५+३+२+२+३) इयत्ता सहावी, सातवी, आठवी या वर्गाचा अंतर्भाव असणारा स्तर म्हणजे उच्च प्राथमिक स्तर होय. —शिक्षण संक्रमण, ऑगस्ट २००८

**कार्यात्मक व्याख्या**

प्रस्तुत संशोधनामध्ये इयत्ता ६ वी ते ८ वी या स्तरावर असणाऱ्या भूगोल पाठ्यपुस्तकातील मानवी भूगोल घटकावर आशय समृद्धी संचासंदर्भात उच्च प्राथमिक स्तराचा विचार केला आहे.

**भूगोल विषय**

**संकल्पनात्मक व्याख्या**

"भौतिक परिस्थितीचा मानवी जीवनावर जो परिणाम होतो त्याचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे भूगोल होय." - रॅटझेल, फ्रेड्रिक (शिंदे, डी.बी. आणि पाटील बी. एम. २००५, पान नं. ३)

**कार्यात्मक व्याख्या**

मराठी माध्यमाच्या शालेय अभ्यासक्रमात सामाजिक शास्त्रे या विषयांतर्गत समाविष्ट करण्यात

आलेला एक विषय ज्याचे पाठयपुस्तक वालभारतीने सन २०१२ पासून अभ्यासक्रमासाठी लागू केले आहे या अर्थाने सदरच्या संज्ञेचा विचार प्रस्तुत संशोधन विषयासाठी केला आहे.

**मानवी भूगोल**

**संकल्पनात्मक व्याख्या**

अस्वस्थ मानव व अस्थिर पृथ्वी यांच्यातील बदलत्या संबंधाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे मानवी भूगोल होय. मिस सेंपल, (खतीब के. ए., १९९७)

**कार्यात्मक व्याख्या**

प्रस्तुत संशोधनात मानवी भूगोल घटकांवर आधारीत बी.ए.बी.एड्. विद्यार्थी-शिक्षकांसाठी आशय समृद्धी संच विकसनासंदर्भात आशय समाविष्ट केला आहे.

**घटक**

**संकल्पनात्मक व्याख्या**

उद्दिष्ट्ये साध्य होण्याच्या दृष्टिने पाठ्यक्रमातील एकजिनसी व सलग भागांची जुळणी म्हणजे 'घटक' होय. (शिंदे, डी. बी. आणि पाटील, बी. एम. २००५, पान नं. १४८)

**कार्यात्मक व्याख्या**

उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील पाठ्यपुस्तकातील मानवी भूगोलासंदर्भात एकजिनसी व समान गुणधर्माचे भाग एकत्र आणून तयार केलेली प्रकरणे (धडे किंवा पाठ) म्हणजे घटक या अर्थाने सदरच्या संज्ञेचा प्रस्तुत संशोधनात विचार केलेला आहे.

**आशय समृद्धी संच**

**कार्यात्मक व्याख्या**

आशय समृद्धी संच असा की ज्यामध्ये महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांनी प्रकाशित केलेली अनुक्रमे इयत्ता ६ वी ते ८ वी पर्यंतची मराठी माध्यमातील भूगोल विषयाच्या

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

पाठ्यपुस्तकातील मानवी भूगोलाच्या संदर्भात असणाऱ्या सर्व आशय घटकावर लिखित (मुद्रित) स्वरूपाची सखोल माहिती व संकल्पनासंदर्भात व्याख्या, तत्वे, नियम, वैशिष्ट्ये, छायाचित्रे, आकृत्या, नकाशे एकत्र करून दृक-मुद्रित स्वरूपाचा संच म्हणजे आशय समृद्धी संच असा अर्थ प्रस्तुत संशोधनात घेण्यात आला आहे.

**विकसन**

**संकल्पनात्मक व्याख्या**

Development is the act or process of developing unfolding a gradual growth or advancement through progressive changes. - New Webster Dictionary, (2007)

**कार्यात्मक व्याख्या**

बी.ए.बी.एड् (एकात्मिक) विद्यार्थी-शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मानवी भूगोल घटकांवर आधारीत आशय समृध्दी संचाची निर्मिती व त्याची परिणामकारकता तपासणे म्हणजे विकसन होय.

**अभ्यास**

**संकल्पनात्मक व्याख्या**

Study means an investigation of the perticular subject or the published findings of such an investigation. - (Good, C. V. (1973)

**कार्यात्मक व्याख्या**

बी.ए.बी.एड्. च्या विद्यार्थी-शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मानवी भूगोल घटकांवर आधारीत आशय समृद्धी संचाचे विकसन व त्याची परिणामकारकता पडताळण्यासाठी जमा केलेल्या माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण, अर्थनिर्वचन व निष्कर्ष काढणे म्हणजे अभ्यास होय.

**संशोधनाची उद्दिष्टे** (Objectives of Study)

१) उच्च प्राथमिक स्तरावरील (इयत्ता सहावी ते आठवी) भूगोल विषयाच्या क्रमिक पाठयपुस्तकातील मानवी भूगोलाच्या घटकातील संकल्पनांचा शोध घेणे.

२) बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) च्या विद्यार्थी शिक्षकांसाठी उच्च प्राथमिक स्तरावरील (इयत्ता सहावी ते आठवी) मानवी भूगोलाच्या घटकातील संकल्पनांवर आधारित आशय समृध्दी संचाचे विकसन करणे.

३ ) बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) च्या विद्यार्थी शिक्षकांसाटी उच्च प्राथमिक स्तरावरील (इयत्ता सहावी ते आठवी) मानवी भूगोलाच्या घटकातील संकल्पनांवर आधारित संशोधक निर्मित आशय समृद्धी संच तज्ञांकडून तपासून घेणे.

४) बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) च्या विद्यार्थी शिक्षकांसाठी विकसित केलेल्या आशय समद्धी संचाची परिणामकारकता तपासणे.

**संशोधनाची गृहितके** (Assumpsions)

१) बी.ए.बी.एड्. चे विद्यार्थी-शिक्षक उच्च प्राथमिक स्तरातील इयत्तांवर सरावपाठ घेतात.

२) आशय समृद्धी संचाच्या सहाय्याने अध्ययन परिणामकारक होते.

३) मानवी भूगोल या घटकावर आधारीत आशय समृद्धी संचाचे विकसन करता येते.

४) बी.ए.बी.एड्. च्या विद्यार्थी-शिक्षकांना मानवी भूगोलातील संकल्पना, नियम, तत्त्वे समजण्यास अडचणी येतात.

**संशोधन परिकल्पना** (Hypothesis)

आशय समृद्धी संचाच्या वापरामुळे बी. ए. बी. एड्. विद्यार्थी-शिक्षकांच्या मानवी भूगोलाच्या आशय ज्ञान संपादनात वाढ होते.

**संशोधनाची व्याप्ती** (Scope of the study)

प्रस्तुत संशोधनाअंती विकसित केला जाणारा आशय समृद्धी संच :

१) महाराष्ट्रातील सर्व मराठी माध्यमाच्या बी.ए. बी.एड्. (एकात्मिक) शिक्षणशास्त्रातील पदवी घेणाऱ्या ज्यांची प्रथम व द्वितीय अध्ययन पद्धती भूगोल असणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकांना उपयोगी आहे.

२) भूगोल अध्यापक व शिक्षक आणि अध्यापक शिक्षण पदवीका (D.T.Ed.) शिक्षणशास्त्र पदवी (B.Ed.) घेणाऱ्या छात्राध्यापकांना व उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांना उपयोगी आहे.

**संशोधनाच्या परिमर्यादा**

१) प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील बी. ए. बी. एड् (एकात्मिक) ही शिक्षणशास्त्राची पदवी घेणाऱ्या मराठी माध्यमाच्या ज्यांची प्रथम व द्वितीय अध्यापन पद्धती भूगोल आहे अशा विद्यार्थ्यांसाठी मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधनाच्या आशय समृद्धी संचाची परिणामकारकता तपासणी व संचासंदर्भात तज्ज्ञ म्हणून बी. ए. बी. एड्. (एकात्मिक) पदवीस अध्यापन करणारे भूगोल अध्यापन पद्धतीचे शिक्षक प्रशिक्षक व भूगोल विषय तज्ज्ञ आहेत.

३) प्रस्तुत संशोधनातील आशय समृद्धी संच उच्च प्राथमिक स्तरावरील भूगोल विषयातील मानवी भूगोलाच्या घटकांवर आधारीत आहे..

४) प्रस्तुत संशोधनातील आशय समृद्धी संचाची परिणामकारकता तपासणीसाठी सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात शिकणाऱ्या बी.ए.बी.एड्. (एकात्मिक) विद्यार्थी-शिक्षकांचा समावेश केलेला आहे.

**प्रकरण योजना** (Chapter Scheme)

प्रस्तुत शोध निबंधात संशोधकाने संशोधनाची माहिती कशा प्रकारे मांडलेली आहे, कोणत्या प्रकरणात कोणत्या घटकांचे विवेचन केले आहे. याचा अल्पसा परिचय या प्रकरणात दिला आहे.

**प्रकरण एक : प्रस्तावना**

या प्रकरणात संशोधकाने समस्येची पार्श्वभूमी व महत्त्व, समस्या विधान, त्यामधील पारिभाषिक शब्दांचा अर्थ, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गरज, संशोधनाचे महत्व, संशोधनाची व्याप्ती परिमर्यादा, इत्यादी गोष्टी स्पष्ट केल्या आहेत.

**प्रकरण दोन : संबंधित साहित्य व संशोधनांचा आढावा**

या प्रकरणात संशोधन विषयाशी संबंधित साहित्याचा आढावा घेतला आहे. इतर संशोधकांनी संशोधन विषयाशी संबंधित कोणकोणते संशोधन केले आहे? कोणती साधने वापरली आहेत? कोणते निष्कर्ष मांडले आहेत? याचा आढावा घेऊन प्रस्तुत संशोधन नाविन्यपूर्ण असल्याचे नमूद केले आहे.

**प्रकरण तीन : संशोधन कार्यपद्धती**

या प्रकरणात संशोधकाने संशोधनाच्या कार्यपद्धतीचे वर्णन केलेले आहे. संशोधन म्हणजे काय, संशोधनाच्या पद्धती कोणत्या, संशोधकाने आपल्या संशोधनासाठी कोणती पद्धती व साधने वापरली इ. च्या संदर्भात या प्रकरणात विवेचन केले आहे.

**प्रकरण चार : माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

या प्रकरणामध्ये संशोधकाने मिळालेल्या माहितीची नोंद करून त्या माहितीचे विश्लेषण अर्थनिर्वचन काढलेले आहे.

**प्रकरण पाच : सारांश  निष्कर्ष व सूचना**

या प्रकरणामध्ये संशोधकाने केलेल्या कार्यातून व अभ्यासलेल्या सर्व गोष्टींवरून आलेले अनुमान व शिफारशी दिलेल्या आहेत.

**समारोप**

प्रस्तुत प्रकरणामध्ये संशोधकाने संशोधनाची गरज, संशोधनाचे महत्व, संशोधन समस्या विधान पारिभाषिक शब्दांच्या व्याख्या, संशोधनाची उद्दिष्टे, परिकल्पना, व्याप्ती, व मर्यादा तसेच प्रकरण योजना याचे विवेचन केले आहे.

पुढील प्रकरणात प्रस्तुत संशोधनाशी संबंधित साहित्याचा व संशोधनांचा आढावा घेतला आहे.